न्यायनिर्णय

**मुंबई उच्च न्यायालय**

**नागपूर खंडपीठ नागपूर.**

**फौजदारी रिट याचिका क्र. 772/2021.**

शोएब मेहताब अली,

वय 26 वर्ष, राहणार

गाव नेगला कुतुला, पोस्ट

इकबालपूर, तहसील रुकी,

जिल्हा हैदवार (उत्तराखंड)

(C/5490 मध्यवर्ती कारागृह, अमरावती) ----- **याचिकाकर्ता.**

**विरुद्ध**

1. विभागीय आयुक्त,

   अमरावती विभाग, अमरावती

2. कारागृह अधीक्षक,

   मध्यवर्ती कारागृह, अमरावती ----- **उत्तरवादी**

-----------------

श्री एस. आर. जयस्वाल, याचिकाकर्त्याचे अधिवक्ता

सहायक सरकारी अभियोक्ता श्री एम जे. खान, उत्तरवादी करिता

-----------------

**न्यायमंच : न्यायमूर्ती विनय जोशी आणि**

**न्यायमूर्ती वाल्मिकी एसए मेनेझेस**

**राखून ठेवण्याचा दिनांक :** 09.02.2023

**न्यायनिर्णय घोषित दिनांक :** 21.02.2023

**न्यायनिर्णय** (द्वारा न्यायमूर्ती विनय जोशी)

या प्रकरणातील विवाद लक्षात घेऊन आणि संबंधित पक्षांच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान अधिवक्त्यांच्या संमतीने ही फौजदारी रिट याचिका स्वीकृत करण्याच्या टप्प्यावर, अंतिम निकालासाठी **अधिनिर्णय** जारी करून त्यावर उत्तर तात्काळ मागविण्यात आले.

2. याचिकाकर्त्याने, उत्तरवादी क्र. 1 विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांनी दिनांक:- 14.07.2020 रोजी महाराष्ट्र कारागृह (संचित व अभिवचन रजा) नियमाच्या नियम 19 [3] नुसार पारित आदेशान्वये नियमित अभिवचन रजा नाकारण्यात आली, त्यास आव्हान दिले आहे. याचिकाकर्ता त्यास भारतीय दंड विधान (भा.दं.वि) कलम 302 आणि 397 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले आहे. भारतीय दंड विधान कलम 302 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी त्याला जन्मठेपेची शिक्षा आणि भारतीय दंड विधान कलम 397 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी त्यास 10 वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा न्यायालयाने दिलेली आहे.

3. याचिकाकर्त्याने आपल्या वडिलांच्या गंभीर आजारपणाच्या कारणाने नियमित अभिवचन रजेची मागणी केली आहे. त्याच्या दाव्याच्या समर्थनार्थ त्याने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले आहे. याचिकाकर्ता 30 जून 2013 पासून तुरुंगात आहे आणि त्यामुळे त्यांचे म्हणण्यानुसार न्यायालयीन शिक्षेचा वजावट व सूट

धरून त्याने दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा भोगली आहे, त्यामुळे तो अभिवचन रजेसाठी पात्र आहे.

4. उत्तरवादी क्र.1 यांनी प्रतिकूल पोलिस अहवालाच्या आधारे याचिकेकर्त्या ची अभिवचन रजा नाकारली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार याचिकाकर्त्याने 10 वर्षांचा तुरुंगवास पूर्ण केला नाही व त्यामुळे तो नियमित अभिवचन रजेचे पात्रता निकष पूर्ण करू शकला नाही.

5. राज्य सरकारने प्रतिज्ञापत्रावर उत्तर दाखल करून याचिकेस विरोध केला आहे. कारागृह (मुंबई संचित रजा व अभिवचन रजा) नियम, 1959 (संक्षेपासाठी यापुढे '**नियम**' असे संबोधण्यात आले आहे) मधील नियम 2 [4] अनुसार पात्रता निकष पूर्ण करत नसल्यामुळे याचिकाकर्ता पात्र नसणे हे विरोधाचे मुख्य कारण आहे. सादर करण्यात आले कि व्यक्ती ज्याला कलम 392 ते 402 ह्या गुन्ह्यांखाली अपराधाकरिता शिक्षा ठोठावण्यात आली आहे आणि त्याने संबंधित कलम खाली ठोठावलेली करारनिविष्ट शिक्षा पूर्ण केली नसेल तर त्यांना पात्रता निकषांतून सूट दिलेली आहे. थोडक्यात असे सादर करण्यात आले कि याचिकाकर्त्याने त्याला भा. द. वि. कलम 397 खाली लादण्यात आलेला 10 वर्षांच्या प्रत्यक्ष कारावास पूर्ण न केल्यामुळे तो पात्र नाही.

6. दुसरीकडे याचिकाकर्त्याचे विद्वान अधिवक्ता याचे म्हणणे आहे की याचिकाकर्त्याने आधीच दहा वर्षांचा तुरुंगवास पूर्ण केला आहे, ज्यात न्यायालयीन शिक्षेची वजावट व सूट समाविष्ट आहे. त्यांनी उत्तरी प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. 2 कडे आमचे लक्ष्य वेधले आहे, ज्यामध्ये तुरुंग अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्राबाबत उल्लेख केला आहे ज्यामध्ये असे नमूद आहे की याचिकाकर्त्याने 10 वर्ष 1 महिना 26 दिवस तुरुंगवास भोगला आहे, ज्यात न्यायालयीन शिक्षेची वजावट व सूट समाविष्ट आहे.

7. विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे

की न्यायालयीन शिक्षेची वजावट व सूट गणनेसाठी विचारात घेऊ शकता येत नाही, कारण अंतिम सुटके वेळी वरील पैलूचा विचार करायचा आहे. थोडक्यात त्यांचे म्हणणे कि नियम 4 (2) च्या अनुषंगाने तुरुंगवासाचा वास्तविक कालावधी विचारात घेतला जाईल.

8. या उलट याचिकाकर्त्यांचे म्हणणे कि भारतीय दंड विधानाच्या कलम 397 नुसार दंडनीय गुन्ह्यासाठी त्याला 10 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जर त्याला केवळ त्या कलमाखाली दोषी ठरवण्यात आले असते, तर त्याची सुटका झाली असती आणि म्हणूनच न्यायालयीन शिक्षेची वजावट व सूट समाविष्ट करून गणना केली गेली पाहिजे. या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ, त्यांनी **गोरख @बाबा पटोले – विरुद्ध – महाराष्ट्र सरकार–1993 [2] Mh. L. J. 1423** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

9. याउलट, विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी **जालिंदरसिंग अजितसिंग कल्याणी – विरुद्ध – महाराष्ट्र राज्य–2017 All MR (Cri.) 4373** प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर विश्वास दर्शवून असे कथन केले आहे की संबंधित कलमांतर्गत दोषीने तुरुंगवासाची शिक्षा भोगली असली तरी नियम 4 [2] लागू असेल. त्याचप्रमाणे त्यांनी **कमल मायाराम कनोजिया – विरुद्ध – महाराष्ट्र राज्य आणि इतर–2013 All MR (Cri.) 983,** प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये असे ग्राह्य धरले आहे की नियम 4 [2] अंतर्गत निर्माण झालेल्या निर्बंधामुळे कलम 392 ते 402 अंतर्गत गुन्हा केल्याबद्दल दोषी ठरलेली व्यक्ती संचित रजा मंजूर करण्यास पात्र नाही असे आले आहे. एवढेच नाही तर, विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी **जुवानसिंग लखूभाई जडेजा – विरुद्ध – गुजरात राज्य–1972 Lawsuit(Gujarat) 32** गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये नियम 4 [2] हे घटनात्मक दृष्ट्या वैद्य ठरविले आहे.

10. नियम 4 [2] च्या वैधतेसंदर्भात सादर केलेल्या कथनाबाबत कोणताही वाद नाही. वर उल्लेखित **कमल मायाराम कनोजिया** प्रकरणात, भारतीय दंड विधानच्या कलम 392 ते 402 अंतर्गत अपराध सिद्ध झाल्यास नियम 4 [2] नुसार सिद्धापराधीला संचित रजा मिळण्यास प्रतिरोध करतो. नियम 4 [2] ची वैधता आणि प्रयोज्यतेबद्दल आम्हाला कोणतीही शंका नाही. तथापि, विचारात घेण्यायोग्य एक विशिष्ठ प्रश्न आहे कि – कलम 397 अंतर्गत दिलेली शिक्षा भोगल्यानंतरही कैदी त्याला दिलेली शिक्षा नियम 4 [2] च्या कक्षेत येत असल्यामुळे कैद्याला ह्या कारणावरून अजूनही प्रतिरोधित करता येवू शकते काय?

11. वर उल्लेखित **गोरख पटोले** प्रकरणात, हाच मुद्दा या न्यायालयासमोर विचारार्थ आला. या प्रकरणातील आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम 397 आणि 302 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी शिक्षा ठोठावण्यात आली होती. आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम 397 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी 7 वर्षांचा कारावास आणि कलम 302 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. ही दोन्ही शिक्षा एकाच वेळी भोगण्याचे आदेश देण्यात आले होते. सात वर्षाची शिक्षा भोगल्यानंतर आरोपीने संचित रजेकरिता अर्ज केला. त्या परिस्थितीत न्यायालयाने असे मत व्यक्त केले की बंदयाने भा. द. वि. चे कलम 397 अंतर्गत शिक्षा भोगलेली आहे, त्यामुळे रोध लागू होत नाही. निर्णयामधील परिच्छेद क्रमांक 3 मधील संबंधित भागात असे म्हंटले आहे कि :–

> "...... सात वर्षांचा तुरुंगवास भोगल्यानंतर याचिकाकर्ता भारतीय दंड विधानाचे कलम 397 अंतर्गत बंदी राहणार नाही. जर त्याला केवळ कलम 397 अंतर्गत दोषी ठरविण्यात आले असते, तर तो बंदिवासातून मुक्त झाला असता. भारतीय दंड विधानाचे कलम 302 अंतर्गत दिलेल्या शिक्षेमुळे त्याचा तुरुंगवास कायम आहे. तो नियम 4 च्या श्रेणी 2 अंतर्गत येणारा

कैदी राहिलेला नाही कारण फक्त इतर शिक्षेच्या समवर्ती स्वरूपामुळे त्याला संचित रजे करीता अपात्र ठरविता येत नाही. नियम 4 [2] चे विरोधाभासी अर्थ लावणे नियमांतील शब्दांच्या आणि तत्वाच्या विरोधात होईल."

12. जरी विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी **जलिंदरसिंग अजितसिंग कल्याणी** या वर उल्लेखित प्रकरणात या न्यायालयाने घेतलेल्या प्रतिकूल दृष्टिकोनावर विश्वास दर्शविला आहे, परंतु आता स्थिती बदलली आहे. नियम 4 [2] चा अर्थ लावून सदर निर्णय सन 2017 साली देण्यात आला होता, ज्यामध्ये असे म्हंटले आहे कि :–

" 4 [2]भारतीय दंड विधानाचे कलम 392 ते 402 ( दोन्ही समाविष्ट) अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरविलेले सिद्धदोष बंदी".

दिनांक 16.04.2018 रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर नियम 4 [2] बदलण्यात आला आहे . ज्यात असे म्हंटले आहे कि :–

" 4 [2]भारतीय दंड विधानाचे कलम 392 ते 402 (दोन्ही समाविष्ट) अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरलेले कैदी [संबंधित कलमातील निर्धारित शिक्षा पूर्ण झाल्यानंतर कैदी संचित रजा मिळण्यास पात्र असतील]".

अशा प्रकारे सदर बदली नियमात अपवाद आहे की संबंधित कलमासाठी निर्धारित शिक्षेची मुदत पूर्ण झाल्यावर कैदी संचित रजा मिळण्यास पात्र असतील. सदर पर्यायी नियम हे **जलिंदरसिंग अजितसिंग कल्याणी** [ वर उल्लेखित ] प्रकरणात घेतलेल्या निर्णयापश्चातचा होता, आणि म्हणून सदर निर्णय सरकारी पक्षास कोणत्याही प्रकारे साहाय्यभूत होणार नाही.

13. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सादर केले की विधानाचे कलम 397 अन्वये ठोठावण्यात आलेली शिक्षा पूर्ण झाल्यानंतर बदली

नियम संचित रजेवर सोडण्याची परवानगी देतो, परंतु त्यांनी पुढे सादर केले की न्यायालयीन शिक्षेची वजावट व सुट मोजली जाऊ शकत नाही. त्यांचे म्हणनेनुसार या कालावधीची गणना वास्तविक सुटकेच्या वेळी केली जाईल आणि त्यापूर्वी नाही. दुसऱ्या शब्दात त्यांनी सादर केले कि कैद्याने 9 वर्षे, 3 महीने आणि 10 दिवस वास्तविक कारावास भोगला आहे आणि म्हणूनच सध्या तो नियम 4 [2] च्या अनुसार पात्र नाही.

14. आम्ही वरील मुद्द्यांशी सहमत नाही कारण या न्यायालयाने **गोरख पटोले** या प्रकरणातील उपरोलेखित निर्णयामध्ये लागू केलेली सदृशता सध्याच्या परिस्थितीशी पूर्णपणे लागू होते. उत्तरी प्रतिज्ञापत्रानुसार, कैद्याने 10 वर्षे, 1 महिना आणि 26 दिवस तुरुंगवास भोगला आहे, ज्यामध्ये त्याने प्राप्त केलेल्या न्यायालयीन शिक्षेची वजावट व सुट समाविष्ठ आहे. वरील निर्णयात असे आढळून आले आहे की विधानाचे कलम 397 च्या गुन्ह्यासाठी लादण्यात आलेल्या तुरुंगवासाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, कैदी हा विधानाचे कलम 397 अंतर्गत दोषी राहिलेला नाही आणि जर विधानाचे कलम 302 अंतर्गत दोषी ठरविला गेलेला नसता, तर त्याची सुटका झाली असती. जर कैद्याला फक्त विधानाचे कलम 397 अंतर्गत दोषी ठरविण्यात आले असते, मग निश्चितपणे न्यायालयीन शिक्षेची वजावट व सुट मोजली गेली असती, ज्याआधारे त्याची सुटका करण्यात आली असती फक्त विधानाचे कलम 302 अन्वये कैद्याला जन्मठेपेची शिक्षा झाल्यामुळे तो तुरुंगात आहे. म्हणूनच नियम 4 [2] लागू करताना, याचिकाकर्त्याने प्राप्त केलेला न्यायालयीन शिक्षेचा कालावधी व सुट समाविष्ठ करून कालावधीची गणना केली पाहिजे. म्हणून याचिकाकर्त्याने कलम 397 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी फर्मावण्यात आलेल्या शिक्षेचा संपूर्ण कालावधी पूर्ण केल्यामुळे तो संचित रजेकरिता पात्र आहे.

15. प्राधिकाऱ्याने सुद्धा याचिकाकर्त्याचे विरुद्ध प्रतिकूल पोलीस अहवाल असल्याचे कारणावरून याचिकाकर्त्याची विनंती फेटाळली आहे. आक्षेपित

आदेशात असे दिसून येते की याचिकाकर्ता उत्तराखंडचा रहिवासी आहे, त्याचे वय 26 वर्षे आहे आणि त्यामुळे सुटका झाल्यानंतर तो फरार होण्याची शक्यता आहे . आम्हाला अशी कोणतीही तर्क संगत बाब दिसत नाही कि याचिकाकर्ता तरुण असल्यामुळे तो फरार होईल. जर उचित आढळल्यास, याचिकाकर्त्यांच्या प्रकरणाचा विचार करण्यासाठी कोणतेही प्रादेशिक निर्बंध नाहीत.

16. याचिकाकर्त्याचे विद्वान अधिवक्त्यांचे असे म्हणणे आहे की, कोणत्याही इतर पुष्टी देण्याच्या बाबीना केवळ प्रतिकूल अहवाल हि एकाच बाब एखादाही विचारात घेण्यासारखी नाही व त्यांनी ह्या न्यायालयाने **किसन सोमा राठोड –विरुद्ध – महाराष्ट्र राज्य आणि एक – 2017 [5] Mh. L. J. (Cri) 796** च्या प्रकरणात दिलेल्या निर्णयावर विश्वास दर्शविला आहे. याचिकाकर्त्याचे हक्क नाकारण्यासाठी इतर कुठलीही प्रतिकूल परिस्थिती आमच्या निदर्शनास आणण्यात आलेली नाही. सादर करण्यात आले आहे की, गेल्या दहा वर्षांत एकदाहा याचिकाकर्त्याला संचित किंवा अभिवचन रजेवर सोडण्यात आले नाही. सन्मा. सर्वोच्च न्यायालयाने **अश्फाक –विरुद्ध – राजस्थान राज्य आणि इतर – 2017 AIR [SC] 4986** या प्रकरणात कैद्यांना त्यांच्या कौटुंबिक समस्यांचे निराकरण करण्याची संधी मिळावी आणि त्यांचा समाजाशी संबंध टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने संचित व अभिवचन रजा मंजूर करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

17. सरते शेवटी, याचिकाकर्त्याने यापूर्वीच 10 वर्षांचा तुरुंगवास भोगला आहे जो विधानाचे कलम 397 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी लादण्यात आला होता, त्यामुळे तो नियम 4 [2] च्या कक्षेबाहेर आहे आणि अशा प्रकारे नियमित अभिवचन रजे करीता, प्रार्थना केल्याप्रमाणे पात्र आहे. वडिलांच्या आजारपणाचे कारण पोलीस किंवा शासनाने वादग्रस्त ठरवले नाही असे आम्ही म्हणू शकतो. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक 14.07.2021 रोजी दिलेला आक्षेपित आदेश कायद्याने टिकणारा नाही आणि त्यामुळे

तो रद्दबातल करण्यात येतो. आम्ही असे ग्राह्य धरतो की याचिकाकर्त्याला कायद्यामध्ये अनुज्ञेय कालावधीसाठी नियमित अभिवचन रजेचा हक्क आहे. प्राधिकाऱ्याने जे त्यांना योग्य वाटेल, त्या सामान्य नियम आणि अटी लादून याचिकाकर्त्याला नियमित अभिवचन रजेवर मुक्त करावे. प्राधिकाऱ्याने, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्यांच्या आत योग्य आदेश पारित करावे.

18. फौजदारी रिट याचिका मंजूर करण्यात येते आणि त्यानुसार ती निकाली काढली जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश न देता अधिनिर्णय वरील प्रमाणे कायम करण्यात येतो.

**न्यायमूर्ति** **न्यायमूर्ति**

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."